# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२४/प्र.क्र.१७/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: -१६/०१/२०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर.

विषय:- वनजमिन-सातारा
मौजे- क्षेत्र महाबळेश्वर, जि. सातारा, सर्व्हे क्रमांक ५१ अ, गट क्र ७७/१ येथील ३३ केव्ही x ११ केव्ही उपकेंद्र आणि इतर सुविधांचे नियमितीकरण करण्याकरीता ०.३७१६ हे. वनजमिन वळतीकरणाबाबत..

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. डी-१७/एफसीए-एस१/पीआयडी-१५६०८०/कोल्हापूर /२६३८, दि.०७.१२.२०२३.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

(१) जिल्हाधिकारी, सातारा यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सातारा यांना मौजे- क्षेत्र महाबळेश्वर, जि. सातारा येथे सर्व्हे क्रमांक ५१ अ, गट क्र ७७/१ येथील ०.३७१६ हे. जमीन उपलब्ध करुन दिलेल्या दिनांक १६.०४.१९७४ च्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

(२) जिल्हाधिकारी यांनी उपकेंद्रासाठी उपलब्ध करुन दिलेली जमीन रेकॉर्डवर उपलब्ध कागदपत्रांवरून लीजची मुदत १९९९ मध्ये संपली असल्याचे नमूद केले आहे. तथापि, लीज बाबतची कोणतीही कागदपत्रे दिसून येत नाहीत. सदरची कागदपत्रे सादर करावीत.

(३) उपकेंद्राचे बांधकाम सन १९८० पूर्वी केले असल्याचे कोणतेही कागदपत्र जसे की, बांधकामास प्रशासकीय मान्यता आदेश, बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. उपलब्ध नाही. त्यामुळे उक्त बांधकाम दिनांक २५.१०.१९८० पूर्वी झाले किंवा कसे हे निश्चित कळत नाही. याबाबत कागदपत्रे सादर करावीत.

(४) उपवनसंरक्षक, यांनी वनभंग अहवालामध्ये वनविभागासाठी आवश्यकता असेल तेव्हा प्राधान्याने २ सूट आरक्षित ठेवावे, असे नमूद केल आहे. यावरुन प्रस्तावित क्षेत्रामध्ये विश्रामगृह आहे किंवा कसे, असल्यास ते स्थळ विवक्षित आहे का, याबाबतची माहिती सादर करावी.

(५) प्रकल्प यंत्रणेने Judicial Court Wai, Satara येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर प्रकरण कशासाठी दाखल करण्यात आले आहे, त्याबाबतची सद्य:स्थितीदर्शक माहिती सादर करावी

(६) पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केलेल्या मौजे खोलवाडी, ता. वाई, जि. सातारा, येथील कंपा क्र. १६९, गट नं. ४८३, या क्षेत्राचे अधिकार अभिलेख सादर करावा.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर
२. उप वनसंरक्षक, सातारा
३. अति. कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., सातारा.